**प्रसिद्धी पत्रक**

# फ्लिपकार्टकडून फ्लिपकार्ट होलसेलच्या शुभारंभाची घोषणा; किराणा रिटेल परिसंस्थेत आमूलाग्र बदल करण्याचे ध्येय

*क्षमतांचे बळकटीकरण आणि बिझनेस-टु-बिझनेस सेवा पुरवण्यासाठी बेस्ट प्राइस कॅश-अँड-कॅरी व्यवसाय असलेल्या वॉलमार्ट इंडियावर १०० टक्के ताबा*

*किराणा आणि एमएसएमईंच्या व्यवसायवृद्धीला चालना देण्यासाठी गुणवत्ता, प्रबळ तंत्रज्ञानाचा आधार, व्यापारातील व्यापक कौशल्य आणि व्यापक लॉजिस्टिक्स यंत्रणा यांचा वापर करणार*

**बंगळुरू, २३ जुलै २०२० :** फ्लिपकार्ट समूह या संपूर्णत: भारतातच विकसित झालेल्या ई कॉमर्स समूहाने आज फ्लिपकार्ट होलसेलच्या शुभारंभाची घोषणा केली. अत्याधुनिक आणि स्थानिक पातळीवर विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा आधार घेऊन भारतातील किराणा रिटेल परिसंस्थेत आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता असलेली ही नवी डिजिटल बाजारपेठ आहे. समूहाने कंपनीच्या प्रबळ होलसेल क्षमतेचा वापर करून किराणा आणि एमएसएमईंची व्यवसायवृद्धी आणि समृद्धीला अधिक गतिमान करण्यासाठी बेस्ट प्राइस कॅश-अँड-कॅरी व्यवसाय असलेल्या वॉल-मार्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमध्ये १०० टक्के हिस्सा अधिग्रहीत करण्याचीही घोषणा केली.

भारतातील रिटेल परिसंस्थेसाठी किराणा आणि एमएसएमई या मध्यवर्ती आहेत. लहान व्यवसायांना त्यांचा व्यवसाय अधिक सुलभ पद्धतीने करता यावा, यासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने लक्षणीय दरात निवडीचे व्यापक पर्याय उपलब्ध करून देऊन त्यांच्या गरजा भागवण्यावर फ्लिपकार्ट होलसेल लक्ष केंद्रित करणार आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू असतील, सर्वसाधारण उत्पादने असतील अथवा फॅशनशी संबंधित उत्पादने असतील, या व्यावसायिकांना आकर्षक योजना आणि प्रोत्साहनांसह निवडीसाठी व्यापक उत्पादने उपलब्ध करून देतानाच निवडीत मदत करण्यासाठी डाटाच्या आधारे शिफारशीही केल्या जाणार आहेत. तसेच, कार्यक्षमता वाढवून नफ्याच्या प्रमाणात सुधारणा करण्यासाठी अत्यंत जलद आणि विश्वासार्ह यंत्रणेद्वारे डिलिव्हरी केली जाणार आहे.

या व्यतिरिक्त किराणा आणि एमएसएमईंना फ्लिपकार्टच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून रोखतेचे सुलभ पर्याय आणि उत्पन्न वाढीसाठी नव्या संधीही उपलब्ध होतील, जेणेकरून व्यवसायवृद्धीचे नवे मार्ग त्यांच्यासाठी खुले होतील. कोव्हिड-१९च्या साथीमुळे व्यवसायावर विपरित परिणाम झालेला असतानाच्या

या काळात किराणा आणि एमएसएमई आपल्या क्षमतेइतका व्यवसाय आणि नफा मिळवणे साध्य करण्यासाठी प्रयत्न करत असताना अशा प्रकारच्या संधी उपलब्ध होणे अधिक कालसुसंगत आहे.

फ्लिपकार्टने देशांतर्गत विकसित केलेली प्रबळ तंत्रज्ञानात्मक क्षमता, ग्राहक ई-कॉमर्स क्षेत्रातील व्यापक आघाडी आणि भारतातील उद्योग क्षेत्राची सखोल समज यांचा उपयोग फ्लिपकार्ट होलसेलच्या व्यवसायासाठी होईल. फ्लिपकार्ट समूहाच्या व्यापक अशा पुरवठा साखळी यंत्रणेचा वापर देशभरातील किराणा आणि एमएसएमईंपर्यंत पोहोचण्यासाठी या व्यवसायाला होईल. वॉलमार्ट इंडियाच्या चमूचा व्यापारातील अनुभव, ब्रँड्सशी असलेले त्यांचे घट्ट नातेसंबंध, किराणांना सेवा पुरवण्याचा त्यांच्या नसानसात भिनलेला डीएनए आणि बेस्ट प्राइस दुकाने चालवण्याचा १२ हून अधिक वर्षांचा अनुभव या सर्वांचा उपयोग फ्लिपकार्ट होलसेलला होईल. भारतातील सर्वाधिक मोठा कॅश-अँड-कॅरी व्यवसाय असलेले बेस्ट प्राइस सद्यस्थितीत किराणा, अन्नपदार्थ विक्रेते (हॉटेल्स, रेस्तराँ, कॅफेज) आणि अन्य एमएसएमईंचा समावेश असलेल्या १५ लाखांहून अधिक सदस्यांना आधार देत असून दीर्घकालीन पुरवठादार वैविध्य आणि विकास कार्यक्रम राबवण्यात येतो. भारतीय वाणिज्य उद्योगाला आपल्या क्षमतांचा पुरेपूर वापर करता यावा, यासाठी फ्लिपकार्ट होलसेल तंत्रज्ञानात्मक साधने आणि इकोसिस्टिम पार्टनरशिप विकसित करत राहील.

किराणा आणि एमएसएमईंना वैविध्यपूर्ण उत्पादने व वस्तू उपलब्ध व्हाव्यात, यासाठी भारतातील आघाडीचे ब्रँड्स, स्थानिक उत्पादक आणि विक्रेत्यांनी फ्लिपकार्ट होलसेलशी भागिदारी केली आहे. त्याचबरोबर या भागिदारांनाही देशभरात पोहोचण्याचा मार्ग उपलब्ध होतानाच उत्पादन साठ्याचे आणि नवे उत्पादन विकसित करण्यासाठी योग्य नियोजन करण्यासाठी आवश्यक असे बाजारपेठेचे सूक्ष्म आकलन आणि किफायतशीर वितरणाचा लाभ होईल.

फ्लिपकार्ट समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण कृष्णमूर्थी म्हणाले, "भारतात ई कॉमर्सचा पाया रचणाऱ्या फ्लिपकार्ट समूहाने लक्षावधी भारतीय ग्राहकांचा खरेदी करण्याचा अनुभव आमूलाग्र बदलून टाकला आहे. फ्लिपकार्ट होलसेलच्या माध्यमातून आता आम्ही तंत्रज्ञान, लॉजिस्टिक्स आणि अर्थपुरवठा यासंदर्भातील आमच्या क्षमतांचा लाभ देशभरातील छोट्या उद्योगांना उपलब्ध करून देणार आहोत. वॉलमार्ट इंडियाच्या अधिग्रहणामुळे होलसेल व्यवसायाची सखोल जाण असलेल्या गुणवान चमूची भर पडली असून त्यामुळे किराणा आणि एमएसएमईंच्या गरजांची पूर्तता वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने करण्याच्या आमच्या क्षमतेत वृद्धी होणार आहे. या ताज्या घडामोडींमुळे फ्लिपकार्ट समूह अंतिम ग्राहक आणि व्यवसायांसाठी मूल्यवर्धन आणि निवडपर्याय वाढवण्यासाठी अधिक सक्षम होईल."

**वॉलमार्ट इंटरनॅशनलचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ज्युडिथ मॅकेना** म्हणाले, "गेल्या दशकभराहून अधिक काळ भारतातील किराणा आणि एमएसएमईंना सेवा पुरवून, अल्पभूधारक शेतकऱ्यांना पाठबळ देऊन आणि देशभरात ग्लोबल सोर्सिंग आणि तंत्रज्ञान हब्ज विकसित करून भारताच्या

समृद्धीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. फ्लिपकार्ट होलसेलच्या शुभारंभाच्या निमित्ताने कॅश अँड कॅरीचा पाया रचणाऱ्या वॉलमार्ट इंडियाचा कॅश अँड कॅरीचा वारसा आणि फ्लिपकार्टची कल्पक संशोधनाची संस्कृती यांचा हा अपूर्व संगम असल्यामुळे हे एक मोठे पाऊल आहे. एकमेकांच्या क्षमता आणि कौशल्याचा वापर करून हा एकत्रित चमू भारतीय व्यवसायांना वृद्धीसाठी व यशासाठी मदत करण्याच्या एकत्रित ध्येयाच्या दिशेने अधिक दमदार वाटचाल करेल. फ्लिपकार्ट होलसेलचे भवितव्य उज्ज्वल असेल, असा आम्हाला विश्वास आहे.”

फ्लिपकार्ट होलसेलला ऑगस्ट २०२० पासून सुरुवात होत असून दैनंदिन गरजेच्या वस्तू (ग्रोसरी) आणि फॅशन या श्रेणींपासून प्रायोगिक तत्त्वावरील सेवा सुरू करण्यात येणार आहे. फ्लिपकार्टमधील ज्येष्ठ अधिकारी आदर्श मेनन हे फ्लिपकार्ट होलसेलचे नेतृत्व करणार असून वॉलमार्ट इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी समीर अगरवाल हे सुलभ परिवर्तनासाठी काही काळ कंपनीसमवेत काम करणार असून काही काळानंतर वॉलमार्टमध्ये त्यांना अन्य जबाबदारी देण्यात येणार आहे.

**फ्लिपकार्ट होलसेलचे प्रमुख आणि वरिष्ठ उपाध्यक्ष आदर्श मेनन** म्हणाले, “किराणा आणि एमएसएमईंच्या प्रति गेल्या अनेक वर्षांपासून असलेली वॉलमार्ट इंडिया आणि फ्लिपकार्ट समूहाची बांधिलकी फ्लिपकार्ट होलसेल अधिक मजबूत करेल. व्यवसायवृद्धी आणि उत्पन्न वाढीसाठी हजारो किराणांनी यापूर्वीच फ्लिपकार्ट समवेत भागिदारी केली आहे. या नव्या उपक्रमाचा भाग होताना मी उत्हासित आहे. किराणांचा व्यवसाय अधिक वाढावा आणि त्यांचे आयुष्य समृद्ध व्हावे, यादृष्टीने त्यांच्यासाठी अधिक संधी उपलब्ध करून देणे आम्हाला या उपक्रमामुळे शक्य होणार आहे. किराणा आणि एमएसएमई यांच्यासाठी होलसेल अनुभवात आमूलाग्र बदल करण्याच्या ध्येयावर आम्ही ठाम असून त्यासाठी फ्लिपकार्ट आणि वॉलमार्टच्या परस्परसुसंगत क्षमतांचा वापर केला जाणार आहे.”

**वॉलमार्ट इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी समीर अगरवाल** म्हणाले, “भारताच्या आर्थिक प्रगतीत आणि समृद्धीत किराणा आणि एमएसएमई यांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर शिक्कामोर्तब करणारी ही घडामोड असून वॉलमार्ट इंडिया आणि फ्लिपकार्ट होलसेल यांच्या एकत्र येण्यामुळे भारतात १२ वर्षांहून अधिक काळ किराणा क्षेत्राला सेवा पुरवण्याचा बेस्ट प्राइसचा वारसा अधिक बळकट करण्याची संधी मिळणार आहे.”

वॉलमार्ट इंडियाच्या या व्यवसायाच्या अधिग्रहणामुळे त्याचे कर्मचारी फ्लिपकार्ट समूहात सहभागी होतील आणि येत्या वर्षभरात त्यांचे सामिलीकरण होईल. आपली २८ दुकाने आणि ई कॉमर्स व्यवहाराच्या माध्यमातून द बेस्ट प्राइस आपल्या १५ लाखांहून अधिक सदस्यांना सेवा पुरवणे सुरूच ठेवणार आहे.

**About Walmart, Inc. in India**

For over a decade, Walmart, Inc. has maintained a commitment to benefit people and businesses across India. It enables a mix of shopping experiences and helps local sellers and suppliers, including kiranas, MSMEs, farmers, artisans and women-owned businesses, to

modernize, prosper and create local jobs. Walmart India Development Center is engaged in cutting-edge engineering and product development to offer customers anywhere, anytime shopping experience. Walmart’s Bangalore Global Sourcing hub exports high-quality India-made goods to major markets worldwide. The Walmart India Development Center and Walmart Global Sourcing will continue to operate under their existing structure and remain unchanged by this acquisition. The Flipkart Group operates India’s leading e-commerce ecosystem, with Flipkart; fashion site Myntra; Flipkart Wholesale, which now includes the Best Price brand; the PhonePe payments and financial services platform; and the Ekart logistics network.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

For more information, please contact media@flipkart.com.

###